चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी यांचे अखत्यारीतील योजनांतर्गत योजनेतील २८ अस्थायी पदांना सन २०१९-२० कालावधी करिता मुदतवाढ देणे बाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१२७/फ-९
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०२ एप्रिल, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय क्रमांक, असंक-१००४/प्र.क्र.१२ (भाग-२)/२००४/वित्तीय सुधारणा-१, दि.०८.१०.२००४
२) महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.एफडीएम-२०१८/प्र.क्र.२५/फ-२, दिनांक २६ मार्च, २०१८
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३९४/फ-९, दिनांक २४.१०.२०१८
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दिनांक २१.०२.२०१९
५) मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-३/ योजनेत्तर/ प्र.क्र.५३/१८-१९/२१८७/१८-१९, दिनांक २८.०२.२०१९

शासन निर्णय :-

चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी यांच्या अखत्यारीतील योजनांतर्गत योजनेतील २८ अस्थायी पदांना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील संदर्भ क्र.२ व ३ अन्वये दिनांक ०१.०३.२०१८ पासून दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत चालू ठेवण्याबाबत मुदतवाढ देण्यात आली होती. आता सन २०१९-२०२० मध्ये सदर २८ पदे पुढे दिनांक ०१.०३.२०१९ ते दि.२९.०२.२०२० पर्यंत चालू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.५ अन्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

वित्त विभागाने संदर्भ क्र.४ वरील दि.२१.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), नागपूर यांचेकडील संदर्भ क्र.५ वरील दि.२८.०२.२०१९ च्या पत्रासोबतचा प्रस्ताव विचारात घेता हया शासन निर्णयान्वये चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी यांच्या अखत्यारीतील योजनांतर्गत योजनेतील सोबतच्या विवरणपत्रातील २८ अस्थायी पदांना **दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९** पर्यंत चालू ठेवण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

या पदांवर होणारा खर्च हा उपरोक्त खर्च मागणी क्रमांक-सी-७, प्रधान शिर्ष २४१५, कृषी विषयक संशोधन व शिक्षण, २७७-शिक्षण, (००) (०३) “चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन अकादमी चंद्रपूर” (२४१५-१०७७) या लेखा शिर्षाअंतर्गत सन २०१९-२० मध्ये मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. या कालावधीमध्ये मंजूर पदांचा आढावा घेऊन, सुधारित आकृतीबंधास उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

प्रस्तूत शासन निर्णय हा वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्रमांक-पदनि २०१६/ प्र.क्र.०८/ १६/ आ.पु.क., दि.२१.०२.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४०३११५०१०४४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

VIJAYKUMAR VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: CN = VIJAYKUMAR VASUDEO PATIL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2019.04.03 11:56:16 +05'30'

(वि. वा. पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजीक वनीकरण, पुणे.
६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, म.रा. नागपूर/ पुणे/ मुंबई
७) मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण) पुणे
८) सर्व मुख्य वनसंरक्षक /सर्व वनसंरक्षक /उपवनसंरक्षक,
९) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय मुंबई.
१०) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११) कोषागार अधिकारी जिल्हा कोषागार यांचे कार्यालय ,चंद्रपूर.
१२) कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)

शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१२७/फ-९, दिनांक ०२.०४.२०१९ सोबतचे विवरणपत्र चंद्रपूर वन प्रशासन विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी यांच्या अधिपत्याखालील अस्थायी पदांची स्थिती:-

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या	शेरा
१	संचालक (वनरक्षक दर्जा)	१	शासन निर्णय क्रमांक एफडीएम-२०१५/ प्र.क्र.४५/ फ-२, दि.१३.०२.२०१५ अन्वये
२	शारीरीक शिक्षण निर्देशक	१	
३	लिपीक	२	
४	प्रयोगशाळा परीचर	१	
५	शिपाई	४	
६	मुख्य लेखापाल	१	
७	केअर टेकर	१	
८	माळी	२	
९	सफाई कामगार	२	
१०	चौकीदार	१	
११	अपर संचालक (निर्देशक)	१	
	एकूण	**१७**	
१२	उपअभियंता	१	शासन निर्णय क्रमांक एफडीएम-२०१५/ प्र.क्र.७९/फ-२, दि.३१.०३.२०१५ अन्वये (संचालकाचे १ पद द्विरुक्ती झाल्याने कमी करण्यात आले आहे)
१३	लघुलेखक उच्चश्रेणी	१	
१४	वाहन चालक	२	
१५	वनरक्षक	२	
१६	ग्रंथालय परीचर	१	
	एकुण	**७**	
१७	सहाय्यक वनसंरक्षक	३	शासन निर्णय क्रमांक एफडीएम-२०१४/ प्र.क्र.६२/फ-२ दि.०४.१२.२०१४ नुसार सहाय्यक वनसंरक्षक या पदाची श्रेणी अवनत करुन वनपरिक्षेत्र अधिकारी हे पद दर्शविण्यात येत आहे.
१८	वनपरिक्षेत्र अधिकारी	१	
	एकुण	४	
	एकुण पदे १७+७+४	२८	

VIJAYKUMAR VASUDEO PATIL

Digitally signed by VIJAYKUMAR VASUDEO PATIL
DN: CN = VIJAYKUMAR VASUDEO PATIL, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2019.04.03 11:56:28 +05'30'

(वि. वा. पाटील)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग